# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक १४/१०/२०२४ चे ठराव**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७०** **विषय क्रमांक - ७७०**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७०<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.साप्रवि/७/कावि/४५१/२०२४ दिनांक - ११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लेखापाल व लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन वेतनश्रेणी व संवर्गामध्ये बदल करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७०<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र. साप्रवि /७/कावि/ ४५१/२०२४ दिनांक - ११/१०/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-२०१९/प्र.क्र.२३४ (भाग-१) / कार्या-१२ दिनांक २३ मे २०२२ अन्वये लिपिक वर्गीय गट-क मधील पदोन्नतीचे स्तर कमी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने लिपिक वर्गीय गट-क (लेखा संवर्ग) पदोन्नतीची साखळीमध्ये खालील प्रमाणे बदल प्रस्तावित करण्यात येत आहे.<br><br>१. महापालिका आस्थापनेवरील लिपिक वर्गीय गट-क (लेखा संवर्ग) पदोन्नतीची साखळी -<br><br>पिंपरी चिंचवड महानगरपलिका आस्थापनेवर सद्य:स्थितीत लिपिक वर्गीय गट-क (लेखा संवर्ग) पदाची उर्ध्वगामी पदोन्नती साखळी खालील आहे.<br><br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) (गट-अ)<br>↑<br>उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी / उप मुख्य लेखा परिक्षक (गट-अ)<br>↑<br>लेखाधिकारी (गट-ब)<br>↑<br>लेखापाल (गट-क)<br>↑<br>उपलेखापाल (गट-क)<br>↑<br>लिपिक (गट-क)<br><br>२. लेखापाल पदाची वेतनश्रेणी -<br>पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाव्या वेतन आयोगानुसार लेखापाल हे पद गट क मध्येच दर्शविण्यात येवून वेतनश्रेणी र.रू.९३००-३४८०० ग्रेड वेतन ४६०० व |

| | |
|---|---|
| | सातव्या वेतन आयोगानुसार पे लेव्हल एस-१५ (४१८००-१३२३००) ग्रेड पे - ४४०० असे आहे.<br>३. लेखापाल व लेखाधिकारी यांची कर्तेव्ये व जबाबदा-या -<br>लेखापाल व लेखाधिकारी या पदांकरीता प्रामुख्याने लेखा व वित्तीय कामकाजाशी संबंधित नियोजन, संघटन, निदेशन वा संचालन, अभिप्रेरणा, समन्वय व नियंत्रण राखणे इ. समान जबाबदा-या व कर्तव्ये आहेत. असे असताना लेखापाल या अभिनामाचे पद गट –क संवर्गामध्ये तर लेखाधिकारी या अभिनामाचे पदाचा गट-ब संवर्गामध्ये अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तसेच लेखा सेवेतील लेखाधिकारी व लेखापाल या संवर्गांचे कामकाजाचे स्वरूप देखील एकसमान आहे. महानगरपालिका आस्थापनेवरील “लेखापाल” या अभिनामाच्या पदाचे कर्मचारी हे महानगरपालिकेमध्ये जबाबदारीचे व महत्वाचे पदावर शाखाप्रमुखांचे अधिनस्त पर्यवेक्षकीय कामकाज करीत असतात.<br>४. पदोन्नती साखळीच्या पुनरावलोकनाची आवश्यकता -<br>१. लेखा संवर्ग संरचनांसाठी आदर्श पदोन्नती साखळी विकसित करण्यासाठी व्यवहार्यता धोरण आणि नियोजन तपासले गेले पाहीजे. लिपिक वर्गीय (लेखा संवर्ग) संरचनेमध्ये कार्यात्मक गरजा आणि सेवेची आवश्यकता विचारात घेणे आवश्यक आहे. उक्त पदोन्नती साखळीमुळे सेवेच्या मूळ उद्दिष्टांचा विपर्यास होतो, या पदोन्नतीच्या साखळीतील कार्यात्मक सेवेची मोठ्या संख्येने पदे आढळतात, परंतु सेवेची प्रभावी पुनरावृत्ती होत नाही. उपरोक्त विस्तृत स्वरुपाच्या पदोन्नती साखळीमुळे कधी कधी तदर्थ उपायांचा अवलंब करण्यास भाग पाडले जाते कारण महापालिकेच्या कार्यात्मक आवश्यकता अचूकपणे अपेक्षित नसतात किंवा पदोन्नतीमध्ये अचानक अडथळे येतात. कार्यात्मक आवश्यकता आणि पदोन्नती साखळीमध्ये योग्य संतुलन राखणे हा मुख्य उद्देश असल्याने उपरोक्त पदोन्नती साखळीचे पुनरावलोकन करणे गरजेचे आहे. यास्तव लिपिक वर्गीय (लेखा संवर्ग) पदे शक्य तितक्या योग्य सेवेत विलीन करणे इष्ट आहे.<br>२. संवर्ग व्यवस्थापनामध्ये सेवेतील प्रत्येक कर्मचारी तो स्थिरपणे पदोन्नतीव्दारे पदोन्नती साखळीचा लाभ घेईल असा उद्देश आवश्यक आहे. परंतु महानगरपालिकेमध्ये लिपिक पदावर कामकाज करणा-या कर्मचा-यांना जवळपास १५ वर्षांनंतर उपलेखापाल या पदावर पदोन्नत्ती / बढती दिली जाते. आणि संवर्गाच्या पदोन्नती साखळी रचनेद्वारे लादलेली मर्यादा ज्याने फक्त काही कर्मचा-यांनाच पदोन्नतीच्या साखळीवरच्या उच्च पदापर्यंत पोहोचता येते. त्यामुळे पदोन्नत्ती मिळणेपुर्वीच बरेचसे कर्मचारी स्वेच्छानिवृत्त / सेवानिवृत्त होतात अथवा आणखी १० वर्षे किंवा अधिक वर्षे पदोन्नत्ती करीता वाट पहावी लागते. महानगरपालिकेमध्ये लिपिक, उपलेखापाल व लेखापाल अशी सर्व पदे ही गट - क मधील लेखा संवर्गामध्ये येतात.<br>३. पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या सन २०११ चे जनगणनेनुसार जवळपास १७ लाख एवढी आहे, त्याप्रमाणे मागील काही वर्षांमध्ये शहराच्या लोकसंख्येमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असून वाढते नागरीकारण व त्याअनुषंगाने महानगरपालिकेवर सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत पडणारा बोजा व ताण दिवसेंदिवस सतत वाढत आहे. शहरातील नागरीकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरविणे हे महानगरपालिकेस बंधनकारक आहे, असे असून देखिल महानगरपालिकेमधील प्रत्येक कर्मचारी हा |

सचोटीने व प्रामाणिकपणे कामकाज करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा गट – ब वर्गामध्ये समावेश करणेत आलेला आहे. त्याचप्रमाणे भविष्यकाळात नविन गावांचा महापालिका हद्दीमध्ये समावेश होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. महापालिकेच्या पाच वर्षांच्या भूमिकेचा अंदाज घेण्याचा आणि सेवा / केडरच्या बदलत्या गरजांशी त्याचा संबंध जोडण्याचा गंभीर प्रयत्न झाला पाहिजे. सेवेच्या संवर्ग संरचनेच्या विविध स्तरांमध्ये जेथे कार्यात्मक आवश्यकता पूर्ण करेल आणि पुरेशा पदोन्नती संधी सुनिश्चित होतील तेथे प्रमाणित गुणोत्तर विहित करणे आवश्यक आहे.

५. संवर्ग व्यवस्थापनामध्ये सेवेतील प्रत्येक सदस्य (ती) तो स्थिरपणे शिडीवर चढेल अशी अपेक्षा आणि केडरच्या पिरॅमिडल रचनेद्वारे लादलेल्या मर्यादांबद्दल समेट करणे गरजेचे आहे. ज्यामुळे केवळ काहींनाच शीर्षस्थानी पोहोचता येते. पिरॅमिडल संस्थेची रचना खालच्या स्तरावरील ऑपरेशनल कामासाठी मोठ्या संख्येने आवश्यक असते ज्यांचे पर्यवेक्षण काही मोजक्या लोकांकडून केले जाते आणि ज्यांचे नियंत्रण आणि त्याहूनही कमी लोकांमार्फत मार्गदर्शन केले जाते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे, वैयक्तिक सेवकाच्या दृष्टिकोनातून 'पदोन्नती' महत्त्वाची आहे. कारण ते आर्थिक सुधारणा, उच्च जबाबदा-यांमुळे सेवेतील समाधान आणि, सुधारित सामाजिक स्थिती करीता आवश्यक आहे. आर्थिक सुधारणा आणि सामाजिक स्थिती सुधारणे महत्त्वाचे असले तरी, सेवेच्या सदस्यांच्या प्रेरणेसाठी उच्च जबाबदा-या आणि नोकरीतील समाधान हे कदाचित कमी महत्त्वाचे नाही. सुधारित सामाजिक स्थिती सामान्यतः पदनामाशी संबंधित असते. कार्यात्मक आवश्यकतांचे मूल्यमापन केल्यानंतर, विविध पदांशी संलग्न कर्तव्ये आणि जबाबदा-या मानव संसाधनाचा वापर इष्टतम करण्यासाठी आणि त्याचप्रमाणे सुरळीत प्रगती सुनिश्चित करण्यासाठी पुनर्संचयित केल्या जाऊ शकतात.

६. महापालिकेच्या लेखा संवर्ग पुनरावलोकनांच्या पद्धतीमध्ये गृहमूल्यांकन, मूलभूत बदल, दीर्घकालीन समस्या आणि नियोजन इ. गुणात्मक बदल घडवून आणण्याची गरज आहे. त्यामुळे लेखा संवर्गातील पदोन्नतीमध्ये ३०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे.

कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये एका वेळी ५ वर्षांच्या कालावधीसाठी वैज्ञानिक आधारावर भविष्यातील मनुष्यबळाच्या गरजांचा अंदाज घेणे, भविष्यातील पदोन्नतीमधील अडथळे टाळता येतील अशा प्रकारे पदोन्नती साखळीची योजनेची आवश्यकता, सेवेची परिणामकारकता वाढविणे तसेच कर्मचा-यांच्या पदोन्नतीतील अपेक्षांसह कार्यात्मक गरजा सुसंगत करण्यासाठी पदोन्नती साखळीची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

शासन मंजूर सेवाप्रवेश नियम तसेच मंजूर पदांचा तपशिल -

| **पदनाम** | **वेतनश्रेणी** | **पदसंख्या** | **नेमणूकीची अर्हता** |
|---|---|---|---|
| लेखापाल गट – क | वेतनश्रेणी एस–१५ (र.रु.४१८००-१३२३००) ग्रेड वेतन | २३ | **पदोन्नती १००%-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलेखापाल संवर्गात ३ वर्ष सेवा पुर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती |

| | | | |
|---|---|---|---|
| | ४४०० | | |
| लेखाधि<br>कारी<br>गट – ब | वेतनश्रेणी एस-<br>१६<br>(र.रु ४१८०० –<br>१३२३००)<br>ग्रेड वेतन<br>४६०० | १६ | **नामनिर्देशन (पदोन्नतीने उपलब्ध न झाल्यास)-**<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी / चार्टर्ड अकाऊंट / आय.सी.डब्ल्यू.ए. धारक उमेदवार असल्यास प्राधान्य.<br>२. शासकीय, निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील सहाय्यक लेखा अधिकारी / लेखापाल या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br><br>**पदोन्नती १००%**<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठा कडील वाणिज्य शाखेची पदवी आवश्यक.<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलेखापाल या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

लिपिक वर्गीय (लेखा संवर्ग) पदोन्नती साखळीतील शासन निर्देशानुसार पदोन्नत्तीचे स्तर कमी करणे आवश्यक असलेने लेखापाल पदाचे समावेशन लेखाधिकारी या पदामध्ये करणेत येवून खालील प्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजूरीकामी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या | नेमणूकीची अर्हता |
|---|---|---|---|
| लेखाधिकारी<br>गट – ब<br><br>**(लेखापाल व लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन)** | पे.लेवल S– १७<br>वेतनश्रेणी र.रु ४७६०० - १५११००<br>ग्रेड वेतन – ४८०० | ३९<br><br>(लेखापाल एकुण मंजूर तसेच लेखाधिकारी एकुण मंजूर पदांसह ३०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण) | **पदोन्नती १००%**<br>१. मान्यताप्राप्त विद्यापीठा कडील वाणिज्य शाखेची पदवी आवश्यक.<br>२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलेखापाल या पदावरील किमान ३ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या व विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या अधिका-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. |

उपरोक्त सेवाप्रवेश नियम बदलाच्या पुष्ट्यर्थ खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

१. लेखापाल अभिनामाचे पदोन्नती पुर्व उपलेखापाल अभिनामाची १३८ पदे महापालिकेच्या सुधारित आकृतीबंधामध्ये शासन मंजूरीकामी सादर करण्यात आलेली आहेत. त्यामुळे प्रस्तावित केलेनुसार लेखाधिकारी गट-ब (लेखापाल व लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण करुन) पदोन्नतीकरिता उपलेखापाल एकुण मंजूर पदांच्या ३०% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाणानुसार ४१ पदे सुनिश्चित होत असून उक्त नमूद पदसंख्या ही त्यामर्यादेत आहे.

२. महापालिका आस्थापनेवर लेखापाल अभिनामाची २३ पदे शासन मंजूर आहेत तसेच लेखाधिकारी अभिनामाची एकुण १६ पदे शासन मंजूर आहेत. तथापि, लेखापाल व

| | |
|---|---|
| | लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण केल्यास लेखाधिकारी गट-ब नव्याने ३९ पदे निर्माण करणे आवश्यक आहे.<br>३. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२० नुसार लेखाधिकारी नेमणूकी करीता शासन प्रतिनियुक्तीची तरतुद नाही यास्तव पदोन्नतीकरिता १००% संरचनात्मक गुणोत्तर प्रमाण निश्चित करणे आवश्यक आहे.<br>४. लेखापाल व लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण केल्याने अतिरिक्त २३ पदे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे महापालिकेवर पडणारा आर्थिक भार ३५% खर्चाच्या मर्यादेत राहणार आहे.<br>५. लेखापाल व लेखाधिकारी ही दोन्ही पदे पर्यवेक्षीय असून त्यांच्या जबाबदा-या व कर्तव्ये समान आहेत.<br>लेखापाल व लेखाधिकारी पदाचे एकत्रिकरण करण्याची कार्यात्मक आवश्यकता आहे.<br>प्रस्तुत विषयास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७१** **विषय क्रमांक - ७७१**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७१<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.पअक/०३/कावि/१६६/२०२४ दि.०३/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३३४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिके मध्ये बेकरी/हॉटेल/धाबा यांचेद्वारे होणा-या वायू प्रदुषण कमी करणेकामीचे परिपत्रकास मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७१<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील पत्र क्र.पअक/०३/कावि/१६६/२०२४ दि.०३/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३३४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील हॉटेल/धाबा/बेकरी यांच्या लाकूड कोळसा वापरण्याच्या नियंत्रणाबाबत. शहरातील वाढत्या लोकसंख्ये बरोबरच इंधन वापर ही वाढला असून व्यावसायिक सर्व आस्थापनांना स्वयंपाकासाठी आणि आगीसाठी लाकूड वापर प्रतिबंधित करुन फक्त लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (LPG) किंवा नैसर्गिक वायु वापरणे व पुरविणे याची सुनिश्चिती केली जाईल तसेच इंधन म्हणुन लाकडाचा वापर टप्याटप्पाने बंद करण्यासाठी कृती आराखडा तयार केला जाईल. कोळसा व लाकूड ज्वलन वायू प्रदुषणात महत्वपूर्ण योगदान देते ज्यामुळे हानिकारक कण, कार्बन मोनोऑक्साइड आणि अस्थिर सेंद्रिय संयुगे बाहेर पडतात व त्यामुळे प्रदुषणामध्ये वाढ होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. तसेच पर्यावरणाचा -हास होण्यास हातभार लागतो. हे सर्व कमी करण्यासाठी स्वच्छ इंधन म्हणुन इलेक्ट्रिसिटी / एलपीजी चा |

<table>
<tr><td></td><td>वापर करणेबाबतचे परिपत्रक मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे</td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७२** **विषय क्रमांक - ७७२**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

<table>
<tr><td>ठराव क्र. ७७२<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र.डक्षे/स्था/कावि/१२२७/२०२४ दि.११/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३५३ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे ड क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.२५ मधील चालू विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ-घट करणेस मान्यता देणे बाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ७७२<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र.डक्षे/स्था/कावि/१२२७/२०२४ दि.११/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३५३ दि.११/१०/२०२४ अन्वये, "ड क्षेत्रिय कार्यालयांतर्गत स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र.२५ मधील विशेष योजना विषयक खालील नमूद केलेल्या अनु क्र.१ चे चालू विकास काम नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने पुर्ण करणे आवश्यक आहे. तथापि सदरच्या कामाला सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकात असलेली तरतूद अपुरी पडत असल्याने अनु क्र.२ चे कामातून र.रू.४,००,००,०००/- इतकी घट करून अनु क्र.१ चे कामाच्या तरतुदीत वाढ करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे
<table>
<tr><th>अ. क्र .</th><th>कामाचे नाव</th><th>पान क्र. / अनु क्र.</th><th>लेखाशिर्ष</th><th>सन २०२४-२५ ची मुळ तरतुद</th><th>वाढ</th><th>घट</th><th>सन २०२४-२५ ची सुधारीत तरतुद</th></tr>
<tr><td>1</td><td>प्रभाग क्र.२५ वाकड येथील आरक्षण क्र.४/२३ मध्ये शाळेचे ग्राऊंड डेव्हलपमेंट, फर्निचरची व आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 242500886)</td><td>३३/०६</td><td>स्थापत्य-विशेष योजना</td><td>80000000</td><td>40000000</td><td>0</td><td>120000000</td></tr>
<tr><td>2</td><td>प्रभाग क्र. २५ वाकड येथील आरक्षण क्र. ४/२३ मध्ये शाळेची उर्वरीत कामे करणे. (बजेट कोड 222313349)</td><td>२८/५८</td><td>स्थापत्य-विशेष योजना</td><td>102217000</td><td>0</td><td>40000000</td><td>62217000</td></tr>
<tr><td colspan="4">एकूण</td><td>182217000</td><td>40000000</td><td>40000000</td><td>182217000</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७३** **विषय क्रमांक - ७७३**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७३<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र. पअक/१९/कावि/०८/२०२४ दि.१०/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३५४ दि.११/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेअंतर्गत वातावरणीय कृती कक्ष स्थापन करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७३<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महा मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र. पअक/१९/कावि/०८/२०२४ दि.१०/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४३५४ दि.११/१०/२०२४ अन्वये, वातावरणीय बदलाचे संकट २१ व्या शतकातील मानव जातीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. या शत्तकाखेरीस पृथ्वीचे सर्वसाधारण तापमान मर्यादित ठेवण्यासाठी जगातील १९५ देशांनी मान्य केलेल्या २०१५ च्या पॅरिस आंतरराष्ट्रीय कराराशी भारत वचनबद्ध आहे. भारताने सादर केलेल्या राष्ट्रीय निर्धारीत योगदानानुसार (Nationally Determined Contributions), देशाने २०७० पर्यंत कार्बन उत्सर्जन निव्वळ शून्यापर्यंत (Net Zero) आणण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र शासन पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. २५ जुलै २०२४ अन्वये राज्यातील सर्व अमृत शहरे जिल्हे व महसूल विभागांतर्गत वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्याबाबत शासन निर्णय झालेला आहे. त्या अनुषंगाने मा. सदस्य सचिव विभागीय वातावरणीय कृतीकक्ष पुणे विभाग यांचेकडील पत्र दि. १३/०८/२०२४ व मा. उपआयुक्त नगरपालिका प्रशासन पुणे विभाग यांचेकडील पत्र १३/०९/२०२४ नूसार पिंपरी चिंचवड शहरामध्ये वातावरणीय कृती कक्ष स्थापन करणेबाबत कळविले आहे. अटल मिशन फॉर रिजुवनेशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (AMRUT) अंतर्गत्त समाविष्ट असलेल्या प्रत्येकी १ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रातील ४३ प्रमुख शहरांमधील लोकसंख्येचे राज्याच्या नागरी लोकसंख्येशी असलेले प्रमाण ७६% इतके आहे. या शहरांनी २०२१ मध्ये युनाइटेड नेशन्स समर्थित सिटीज रेस टू झिरो कॅम्पेन मध्ये भाग घेतला होता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा या शहरांमध्ये समावेश आहे. पिंपरी चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, झपाट्याने होत असलेले शहरीकरण, सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक विविधता, जैववैविध्यता असलेल्या पिंपरी चिंचवड शहराला सध्या वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा, अतिवृष्टी, पूर, गारपीट आणि वीज पडणे, यांचा सामना करावा लागत आहे. वातावरणीय बदलाच्या विविध धोक्यांची वारांवरिता व तीव्रता येत्या वर्षांमध्ये वाढत जाणार आहे. म्हणून २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन निव्वळ शून्यापर्यंत (Net Zero) आणण्याच्या उद्दिष्टासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कटिबद्ध आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याकरता पिंपरी चिंचवड शहरात वातावरणीय कृती आराखडे (City Climate Action Plans) तयार करणे आवश्यक आहे. सबब पिंपरी चिंचवड शहरासाठी वातावरणीय कृती कक्ष स्थापन करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७४** **विषय क्रमांक - ७७४**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

<table>
<tr><td>ठराव क्र. ७७४<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र. क्र.वायसीएमएच/१३/कावि/२०८/२०२४ दि.०८/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२६४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत बीएस्सी नर्सिंग कॉलेज व पॅरामेडीकल कोर्से करीता संस्थेचे नाव निश्चित करणेस मान्यता देणे बाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ७७४<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचे कडील क्र. क्र.वायसीएमएच/१३/कावि/२०८/२०२४ दि.०८/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२६४ दि.११/१०/२०२४ अन्वये, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-पीसीसी-२०२२/प्र.क्र.३३२/नवि-२२, दि.२४ जुन २०२२ अन्वये यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयांतर्गत बी.एस्सी नर्सिंग कॉलेज सुरु करणेस तत्वत: मान्यता प्राप्त झाली आहे. शासनाकडील वैधानिक तपासणी समिती प्राथमिक तपासणी करुन संस्थेला आवश्यकता प्रमाणपत्र व संलग्नता मिळणेकामी MUHS कडे शिफारस करते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापिठाकडे संलग्नता व आवश्यकता प्रमाणपत्राकरीता अर्ज करणेपुर्वी सदर संस्थेचे नाव निश्चिती करुन सदर नावास मा.स्थायी समिती सभेमार्फत मा. महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मराठी व इंग्रजी भाषेमध्ये खालील प्रमाणे नाव सुचविण्यात येत असून मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे<br><table><tr><th>मराठी</th><th>English</th></tr><tr><td>पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिचर्या विज्ञान संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय</td><td>PCMC, Institute Of Nursing Sciences Y.C.M.Hospital (PCMC INS YCMH)</td></tr><tr><td>पिंपरी चिंचवड महानगरपालिका पॅरावैद्यकिय प्रशिक्षणसंस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय</td><td>PCMC, Paramedical Training Institute Y.C.M.Hospital (PCMC PTI YCMH)</td></tr></table></td></tr>
<tr><td>**निर्णय**</td><td>**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७५** **विषय क्रमांक - ७७५**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७५<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/१२१८/२०२४ दि.०९/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२८४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे ड क्षेत्रीय कार्यालयाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील प्रभाग क्र.२५, २६, २८ व २९ मधील चालू व नविन विकास कामांच्या तरतुदीमध्ये वाढ-घट करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७५<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.डक्षे/स्था/कावि/१२१८/२०२४ दि.०९/१०/२०२४ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४२८४ दि.११/१०/२०२४ अन्वये, मनपाचे "ड" क्षेत्रिय कार्यालयांतर्गत स्थापत्य विभागाकडील प्रभाग क्र.२५, २६, २८ व २९ मधील भांडवली, महसुली, प-अंदाजपत्रक व विशेष योजना विषयक खालील नमूद केलेल्या अनु क्र.१ ते २३ चालू व नविन विकास कामे नागरिकांच्या सोयीच्यादृष्टीने करणे आवश्यक आहे, तथापि सदरच्या कामांना सन २०२४-२५ च्या मूळ अंदाजपत्रकात तरतूद कमी असल्याने अनु क्र.२४ ते ३१ चे चालू व नविन कामातून र.रू.१,६३,३३,०००/- इतकी घट करून अनु क्र.१ ते २३ च्या कामांच्या तरतुदीत वाढ करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| अनु क्र. | कामाचे नाव | पा.क्र. / अ.क्र. | लेखाशिर्ष | सन २०२४-२५ ची मुळ तरतुद | वाढ | घट | सन २०२४-२५ ची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.२५ वाकड येथील उर्वरीत रस्त्यांचे व प्रभागातील इतर रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. (बजेट कोड 232401113) | ७८/०९ | भांडवली - पथ-डांबरी रस्ते | 1230000 | 100000 | 0 | 1330000 |
| 2 | प्रभाग क्र.२५ वाकड व प्रभागातील इतर परिसरातील स्वच्छतागृहांची देखभाल व दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402467) | २१३/८९ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 200000 | 223000 | 0 | 423000 |
| 3 | प्रभाग क्र.२५ वाकड येथील कस्तुरी चौक सर्व्हे नं.८२ येथून वाहणारा व मुळा नदीपर्यंत जाणा-या नाल्याचे बेडींग करणे व इतर स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 232401137) | ७५/०२ | भांडवली - लोकारोग्य -नाला ट्रेनिंग | 510000 | 170000 | 0 | 680000 |
| 4 | प्रभाग क्र.२५ वाकड मधील विनोदेनगर व इतर भागात पावसाळी पाण्याची लाईन टाकणे व स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 232401134) | ७६/०५ | भांडवली - लोकारोग्य -सरफेस गटर्स | 1210000 | 270000 | 0 | 1480000 |
| 5 | प्रभाग क्र.२५ वाकड मधील विनोदेनगर परिसरात व प्रभागातील इतर भागात स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 232401096) | ८०/०७ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे करणे | 1910000 | 300000 | 0 | 2210000 |
| 6 | प्रभाग क्र.२५ पुनावळे व प्रभागातील इतर परिसरातील पावसाळी पाण्याच्या लाईनची दुरूस्तीची कामे करणे, आवश्यकतेनुसार नविन लाईन टाकणे व इतर स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२३-२४ | २०३/२८ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (मुख्यालय) | 906000 | 120000 | 0 | 1026000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | करीता) (बजेट कोड 232402387) | | | | | | |
| 7 | प्रभाग क्र.२५ ताथवडे गावातील रस्ते डांबरीकरण करणे. (बजेट कोड 222313382) | २८/५९ | स्थापत्य - विशेष योजना | 9660000 | 1700000 | 0 | 11360000 |
| 8 | प्रभाग क्र.२५ पुनावळे गावात रस्त्यांची डांबरीकरणाची कामे करणे. (बजेट कोड 222313387) | २९/६१ | स्थापत्य - विशेष योजना | 9660000 | 1700000 | 0 | 11360000 |
| 9 | प्रभाग क्र. २५ वाकड परिसरातील रस्त्यांचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे. (बजेट कोड 232400446) | २९/६९ | स्थापत्य - विशेष योजना | 10000000 | 6200000 | 0 | 16200000 |
| 10 | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील मनपाच्या विविध इमारतींमध्ये स्थापत्य विषयक किरकोळ दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402465) | २१३/८७ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 0 | 153000 | 0 | 153000 |
| 11 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख मध्ये विविध कार्यक्रमांकरीता मंडप व्यवस्था करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402412) | २१०/३४ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 0 | 352000 | 0 | 352000 |
| 12 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख व प्रभागातील इतर परिसरात खड्डे, चरांचे खडीकरण व डांबरीकरणाने दुरूस्ती करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402431) | २११/५३ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 0 | 290000 | 0 | 290000 |
| 13 | प्रभाग क्र.२६ जगताप डेअरी, पिंपळे निलख गावठाण, विशालनगर व प्रभागातील इतर परिसरात खड्डे, चरांचे खडीकरण व डांबरीकरणाने दुरूस्ती करणे. (सन २०२३-२४ करीता). (बजेट कोड 232402437) | २११/५९ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 0 | 630000 | 0 | 630000 |
| 14 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख व प्रभागातील इतर परिसरात स्थापत्य विषयक देखभाल दुरूस्तीचीकामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402383) | २०२/२४ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (मुख्यालय) | 443000 | 50000 | 0 | 493000 |
| 15 | प्रभाग क्र.२६ वाकड-पिंपळे निलख व प्रभागातील मनपा इमारतींची स्थापत्य विषयक देखभाल व दुरूस्ती विषयक कामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402396) | २०३/३६ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (मुख्यालय) | 500000 | 25000 | 0 | 525000 |
| 16 | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर व प्रभागातील इतर परिसरातील रस्त्यांवरील ट्रेंचेस व चर इत्यादींची WMM, MPM, B.M., B.C. व Cold Mix पध्दतीने दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402375) | २०२/१७ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (मुख्यालय) | 500000 | 50000 | 0 | 550000 |
| 17 | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर येथे मनपाच्या सार्वत्रिक निवडणूक करीता व इतर सांस्कृतिक कार्यक्रमांकरीता विविध ठिकाणी मंडप व्यवस्था पुरविणे व इतर अनुषंगिक कामे करणे. (सन २०२३-२४ करीता) (बजेट कोड 232402363) | २०१/११ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (मुख्यालय) | 700000 | 100000 | 0 | 800000 |
| 18 | प्रभाग क्र.२८ पिंपळे सौदागर परिसरात थर्मोप्लास्ट पट्टे मारणे, नामफलक बसविणे व स्थापत्य विषयक इतर | ८०/०४ | भांडवली - स्थापत्य विषयक | 1340000 | 300000 | 0 | 1640000 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 232401093) | | कामे करणे | | | | |
| | | 19 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील विविध भागात स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 242500819) | ८१/०९ | भांडवली - स्थापत्य विषयक कामे करणे | 1000000 | 1500000 | 0 | 2500000 |
| | | 20 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील आरक्षण क्र.३५५ खेळाचे मैदान मध्ये उर्वरीत स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 232401102) | ८०/१० | भांडवली - स्थापत्य विषयक कामे करणे | 485000 | 600000 | 0 | 1085000 |
| | | 21 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव येथील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची रंगसफेदी करणे व इतर स्थापत्य विषयक इतर अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 242500829) | ५६९/०६ | प- अंदाजपत्रक - प्राथमिक व दुय्यम शिक्षण | 1500000 | 400000 | 0 | 1900000 |
| | | 22 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव स्मशानभूमी व इतर परिसरात स्थापत्य विषयक इतर अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 242500842) | ५७०/०३ | प- अंदाजपत्रक – स्मशान भुमी | 1000000 | 500000 | 0 | 1500000 |
| | | 23 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव व इतर परिसरातील मनपा इमारतींची व संडास मुता-यांची स्थापत्य विषयक दुरूस्तीची कामे करणे. (सन २०२२-२३ करीता) (बजेट कोड 222309547) | २०९/२० | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 0 | 600000 | 0 | 600000 |
| | | 24 | प्रभाग क्र.२५ पुणे-बैंगलोर हायवेच्या पुर्वेकडील वाकड, ताथवडे व पुनावळे येथील महानगरपालिकेच्या दवाखाना इमारतीची रंगरंगोटी करणे व इतर स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 242500830) | ५६९/०१ | प- अंदाजपत्रक - रुग्णालये, प्रसुतिगृह, औषधालये | 1000000 | 0 | 1000000 | 0 |
| | | 25 | प्रभाग क्र. २५ वाकड येथील आरक्षण क्र. ४/२३ मध्ये शाळेची उर्वरीत कामे करणे. (बजेट कोड 222313349) | २८/५८ | स्थापत्य - विशेष योजना | 109500000 | 0 | 7283000 | 102217000 |
| | | 26 | प्रभाग क्र.२५ पुणे-बैंगलोर हायवेच्या पश्चिमेकडील वाकड, पुनावळे व ताथवडे येथील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची रंगसफेदी करणे व इतर स्थापत्य विषयक इतर अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 242500824) | ५६८/०१ | प- अंदाजपत्रक - प्राथमिक व दुय्यम शिक्षण | 2500000 | 0 | 2500000 | 0 |
| | | 27 | प्रभाग क्र.२६ पिंपळे निलख येथील महानगरपालिकेच्या दवाखाना इमारतीची रंगरंगोटी करणे व इतर स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे. (बजेट कोड 242500831) | ५६९/०२ | प- अंदाजपत्रक - रुग्णालये, प्रसुतिगृह, औषधालये | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| | | 28 | प्रभाग क्र.२८ रहाटणी व पिंपळे सौदागर भागातील रस्ते WMM व MPM पध्दतीने विकसीत करणे. (बजेट कोड 242500780) | ७७/०६ | पथ- खडीमुरूमाचेरस्ते | 3365000 | 0 | 450000 | 2915000 |
| | | 29 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव व इतर परिसरातील रस्ते WMM व MPM पध्दतीने विकसीत करणे. (बजेट कोड 242500784) | ७७/१० | भांडवली पथ- खडीमुरूमाचे रस्ते | 5000000 | 0 | 1000000 | 4000000 |
| | | 30 | प्रभाग क्र.२९ पिंपळे गुरव कै.बट्टूराव | ८१ | भांडवली - | 2000000 | 0 | 2000000 | 0 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जगताप उद्यानासाठी नदीच्या कडेने गॅबियन वॉल बांधणे व इतर अनुषंगिक स्थापत्य विषयक कामे करणे. (बजेट कोड 242500820) | /१० | स्थापत्य विषयक कामे करणे | | | | |
| 31 | ड क्षेत्रिय कार्यक्षेत्रा अंतर्गत झालेल्या विविध प्रभागस्तरीय विकास कामांची व अंदाजपत्रकात नाव नसलेल्या विकास कामांची अंतिम बिले अदायगी करणे. (बजेट कोड 222309490) | २०८/०२ | महसुली - किरकोळ दुरूस्ती व देखभाल (प्रभाग) | 1000000 | 0 | 600000 | 400000 |
| एकूण | | | | 168619000 | 16333000 | 16333000 | 168619000 |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७६** **विषय क्रमांक - ७७६**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७६<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्था/कावि/०६/५७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मनपाचे "प्रभाग क्र.१९ मधील चिंचवड सि.स.नं.३८७६ (जुने ब क्षेत्रीय कार्यालय) या ठिकाणी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. कार्यालय विकसित करणे. " या कामाचा सन २०२४-२५ चे अंदाजपत्रकात समावेश करणे व कामांच्या तरतूदीमध्ये वाढ / घट करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७६<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र .अक्षेका/स्था/कावि/०६/५७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, 'अ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील चिंचवड सि.स.नं.३८७६ (जुने ब क्षेत्रीय कार्यालय) याठिकाणी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. कार्यालय विकसित करणेबाबत सह मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. यांनी मागणी केलेली आहे . त्यास मा.आयुक्त सो. यांनी दि.१८/०५/२०२३ रोजीच्या प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. ब इमारतीच्या तळमजल्यावर यापूर्वी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी करिता City Operation Center (COC) व Disaster Recovery Center (DRC) विकसित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदर ठिकाणच्या अ व ब इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. विकसित करण्याचे नियोजन आहे. सदर कामामध्ये पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. यांचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, सह मुख्य कार्यकारी अधिकारी, जनरल मॅनेजर, इतर अधिकारी व कर्मचारी यांची दालने व बैठक व्यवस्था करणे व सभागृह बनविणे. तसेच इमारतीच्या अंर्तभाग व बाह्यभागावर रंगकाम करणे तसेच अधिकारी करिता नविन स्वच्छतागृहे बनविणे व अस्तित्वातील स्वच्छतागृहांचे नुतनीकरण करणे इ. कामे करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार |

केलेले असून त्याची अंदाजे र.रु. १.८० कोटी इतकी येत आहे.

त्यानुषंगाने प्रभाग क्र.१९ मधील चिंचवड सि.स.नं.३८७६ (जुने ब क्षेत्रीय कार्यालय) याठिकाणी पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी लि. कार्यालय विकसित करणे या कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक आहे. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांचेकडील दि. १०/०६/२०२४ चे परिपत्रकानुसार सुधारीत कामासाठी निविदा / अंदाजपत्रकीय रक्कमेच्या किमान २५ % रक्कम ची तरतूद ठेवणे आवश्यक आहे. तथापि. सदरची रक्कम सद्य स्थितीत तरतुदी कामे उपलब्ध नसल्याने उर्वरित तरतूद सन २०२४-२५ चे सुधारीत व २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रकात करणेत येईल.

सदर कामास सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करून खालील तक्त्यानुसार वाढ-घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाज कीय रक्कम | लेखा शिर्ष | पान क्र/ अ क्र | सन २०२४ -२५ ची तरतुद | वाढ | घट | सन २०२४ -२५ चा सुधारीत अंदाजपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१९ मधील चिंचवड सि.स.नं. ३८७६ (जुने ब क्षेत्रीय कार्यालय या ठिकाणी पिं चिंचवड स्मार्ट सिटी लि. कार्यालय विकसित करणे. | १.८० कोटी | विशेष योजन | नविन काम | ० | ५,००,००० | - | ५,००,०००/- |
| २. | प्रभाग क्र.१९ मधील नविन ब प्रभाग प्रशासकीय इमारतीमध्ये फर्निचर,सभागृह व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | २ कोटी | भांडव | ५३/ ३ | १,२०,००,००० | - | ५,००,०००/- | १,१५,००,०००/- |
| | | | | | १,२०,००,००० | ५,००,००० | ५,००,०००/- | १,२०,००,०००/- |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश**

| | |
|---|---|
| | **क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७७** **विषय क्रमांक - ७७७**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

<table>
<tr><td>ठराव क्र. ७७७<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/४५५/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मनपाचे सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात कामाचा नव्याने समावेश करुन प्रशासकीय मान्यता देणे बाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ७७७<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.हक्षेका/वि/कावि/ ४५५ /२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मा. उप आयुक्त, अग्निशामक विभाग यांनी मागणी केलेनुसार व प्रत्यक्ष पाहणी केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे संत तुकाराम नगर येथील मुख्य अग्निशामक केंद्राचे स्थापत्य विभागामार्फत नुतनीकरणाचे काम हाती घेणेत आलेले आहे. त्या अनुषंगाने विद्युत विषयक कामे करणे आवश्यक आहे.अग्निशमन केंद्र इमारतीचे विद्युत विषयक काम करणेकरिता शासकीय दरसुची २०२२-२३ नुसार अंदाजपत्रक तयार केले असुन त्यास रक्कम रु.३६,५३,३९०/- (अक्षरी र.रु. छत्तीस लाख त्रेपन्न् हजार तीनशे नव्वद फक्त ) इतका खर्च अपेक्षित असुन त्यास अग्निशमन विभाग यांचेकडुन तरतुद उपलब्ध होणार आहे. तथापि सदर ठिकाणी विद्युत विषयक कामे करणेकरिता मनपा तर्फे निविदा मागवुन काम करावे लागणार आहे. परंतु सदर कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश नसल्याने सदर कामाचा मनपा अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात समावेश करणेस व मा. महापालिका सभेची प्रशासकीय मान्यता घेणेकामी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br><table><tr><th>अ क्र</th><th>उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नांव</th><th>लेखा शिर्ष नांव</th><th>अंदाजपत्रक पानांक व अ.क्र.</th><th>बजेट कोड</th><th>अंदाजपत्रकीय रक्कम</th><th>उपलब्ध तरतूद र.रु.</th></tr><tr><td>१</td><td>प्रभाग क्र. २० मधील संत तुकारामनगर येथील अग्निशमन केंद्र इमारतीचे विद्युत विषयक कामाचे नुतनीकरण करणे</td><td>स्थापत्य प्रकल्प</td><td>नव्याने समावेश</td><td>नव्याने समावेश</td><td>४००००००</td><td>तरतुद अग्निशमन विभागाकडुन खर्ची टाकणेत येणार आहे.</td></tr></table></td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७८** **विषय क्रमांक - ७७८**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७८<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र अक्षेका/स्था/कावि/०७/१६७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, महानगरपालिकेचे सन २०२४-२५ कामातील तरतूद वाढ / घट करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७८<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र अक्षेका/स्था/कावि/०७/१६७/२०२४ दि.१४/१०/२०२४ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.१४ मधील शाळा इमारती मधील स्थापत्य विषयक कामाची दुरुस्ती, रंगरंगोटी, नुतनीकरण इ.प्रकारची कामे करणे या करिता कामाचे आदेश निर्गत करण्यात आलेले आहेत. सदर कामे नियोजित व मागणी नुसार पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर कामाचे अंतिम बील अदा करण्यासाठी या आर्थिक वर्षात पुरेशी तरतूद नाही त्यामुळे सदर कामास तरतुदीची आवश्यकता आहे.<br>प्रभागातील इमारत दुरुस्ती विषयक कामाचे आदेश निर्गत केले आहे. सदर काम संथगतीने सुरु आहे. यामुळे या आर्थिक वर्षात सदर कामांसाठी करण्यात आलेली तरतूद पूर्ण खर्ची होणार नाही. यामुळे उपरोक्त कामा करिता आवश्यक तरतूद इमारत दुरुस्तीच्या कामातून वर्ग करणे शक्य आहे. त्यामुळे सदर कामाचा खालील तक्त्यानुसार वाढ/घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |

| | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र/ अ क्र | सन २०२४-२०२५ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२४ -२५ चा सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ आकुर्डी व परिसरातील शाळा इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे.(सन २०२३-२४) | ५०.०० लाख | प अंदाजपत्रक प्राथमिक व दुय्यम शिक्षण | ५५२/३ | १७,००,००० | ५,५०,००० | ---- | २२,५०,००० |
| २ | प्रभाग क्र.१४ मधील आकुर्डी व इतर परिसरा मधील मनपा दवाखाना इमारतींची देखभाल दुरुस्तीची कामे करणे. (सन २०२३-२४) | ३०.०० लाख | प अंदाजपत्रक प्राथमिक व दुय्यम शिक्षण | ५५२/६ | १८,००,००० | ---- | ५,५०,००० | १२,५०,००० |
| | एकूण | | | | ३५,००,००० | ५,५०,००० | ५,५०,००० | ३५,००,००० |

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७७९** **विषय क्रमांक - ७७९**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७७९<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र डक्षे/स्था/कावि/१२२९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये, महानगरपालिका हद्दीलगत रस्त्याचे डांबरीकरण व सांडपाणी / ड्रेनेजलाईन जोडणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७७९<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र डक्षे/स्था/कावि/१२२९/२०२४ दि.११/१०/२०२४ अन्वये,पै.अमोल बुचडे कुस्ती अकॅडमी मारुंजी येथे आहे. सदर अकॅडमी ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाकड–ताथवडे गावांच्या सिमेवरील ३० मी. रस्त्यापासून सुमारे ५०० मी. अंतरावर आहे. पिंपरी मनपाच्या वाकड ताथवडे सिमेवरील ३० मी. रस्ता विकसित झाला असून पुढे मारुंजी गावाच्या हद्दीमध्ये उपरोक्त कुस्ती अकॅडमीकरिता रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेजलाईन करणेबाबत मागणी आहे.<br>सदर रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली असता सदरचा रस्ता मनपा हद्दी बाहेरील मारुंजी या गावातील असून सदर रस्ता नादुरुस्त आहे. तसेच तेथे रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर रस्त्यास स्ट्रॉम वॉटरलाईन व ड्रेनेज लाईन नाही. सदर रस्त्याचे डांबरीकरण व ड्रेनेज लाईन टाकणेकामी ढोबळ अंदाजपत्रकानुसार रक्कम रुपये २.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. वाकड येथे मारूंजी हद्दी शेजारी मनपाचे प्रभाग क्र.२५ मधील मधुबन हॉटेल ते इंदीरा रोड २४.०० मी. रूंद रस्ता, सिल्वहर स्पून हॉटेल ते इंदीरा रोड १८.०० मी. रूंद रस्ता, तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणा-या वाकड शिवेपर्यंतचा १८.०० मी. रूंदीच्या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामाची निविदा कार्यवाही सुरू आहे. सदर कामाची निविदा कार्यवाही पुर्ण झालेनंतर या कामातून विषयांकित काम करणे शक्य आहे. तथापि सदरचा रस्ता मारुंजी येथे मनपा हद्दीबाहेर असलेने विषयांकित रस्त्याचे काम मनपाच्या प्रभाग क्र.२५ मधील मधुबन हॉटेल ते इंदीरा रोड २४.०० मी. रूंद रस्ता, सिल्वहर स्पून हॉटेल ते इंदीरा रोड १८.०० मी. रूंद रस्ता, तसेच या दोन्ही रस्त्यांना जोडणा-या वाकड शिवेपर्यंतचा १८.०० मी. रूंदीच्या रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे या कामातून करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८०** **विषय क्रमांक - ७८०**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

<table>
<tr><td>ठराव क्र. ७८०<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र क्रमांक औप्रसं/०१/कावि/१७८/२०२४ दिनांक १०/१०/२०२४ अन्वये, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या “यंत्र दुरुस्ती” या लेखाशीर्षावरुन मध्यवर्ती भांडार विभागाच्या “यंत्रसामुग्री व कच्चामाल खरेदी” या लेखाशीर्षावर तरतूद वर्ग करणेस मान्यता देणे बाबत.</td></tr>
<tr><td>ठराव क्र. ७८०<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४</td><td>मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र क्रमांक औप्रसं/०१/कावि/१७८/२०२४ दिनांक १०/१०/२०२४ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या मनपाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मोरवाडी आणि औद्योगिक प्रशिक्षण संस्था कासारवाडी (मुलींचे) येथे डिजिटल स्मार्ट क्लास रूम आणि आवश्यक अनुषंगिक बाबी यांचे टर्न की प्रोजेक्ट नुसार कामकाज करणेसाठी मे. इंद्रनिल टेक्नोलॉजीज यांना निर्गत करणेत आलेल्या कामकाज आदेशानुसार अदा करावयाचे उर्वरित देयक र.रु.1,04,00,000/- (अक्षरी रुपये एक कोटी चार लाख फक्त) साठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या “यंत्र दुरुस्ती” या लेखाशीर्षावर उपलब्ध असलेल्या र.रु.1,90,12,384/- मधून र.रु.1,05,00,000/- (अक्षरी रुपये एक कोटी पाच लाख फक्त) मध्यवर्ती भांडार विभागाच्या “यंत्रसामुग्री व कच्चामाल खरेदी” या लेखाशिर्षावर खालीलप्रमाणे वर्ग करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.<br>
<table>
<tr><th>विभाग</th><th>लेखाशिर्ष</th><th>सन 2024-25 करिता एकुण तरतूद</th><th>वाढ</th><th>घट</th><th>शेरा</th></tr>
<tr><td>मध्यवर्ती भांडार विभाग</td><td>यंत्रसामुग्री व कच्चामाल खरेदी</td><td>2,00,00,000/-</td><td>1,05,00,000/-</td><td>-----</td><td></td></tr>
<tr><td>औद्योगिक प्रशिक्षण विभाग</td><td>यंत्र दुरुस्ती</td><td>2,00,00,000/-</td><td>-----</td><td>1,05,00,000/-</td><td></td></tr>
<tr><td></td><td></td><td>एकूण</td><td>1,05,00,000/-</td><td>1,05,00,000/-</td><td></td></tr>
</table></td></tr>
<tr><td>निर्णय</td><td>महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.</td></tr>
</table>

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८१** **विषय क्रमांक - ७८१**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८१ दिनांक - १४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र क्रीडा/७/कावि/२५१ /२०२४ दि१४/१०/२०२४ अन्वये, पैरालंपिक कमिटी इंडिया यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पॅरा टार्गेट शुटिंग असोसिएशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मान्यता प्राप्त राष्ट्रीय पॅरा नेमबाजीच्या स्पर्धेसाठी सह आयोजकत्व घेणेस मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ७८१ दिनांक - १४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र क्रीडा/७/कावि/२५१ /२०२४ दि१४/१०/२०२४ अन्वये, पैरालंपिक कमिटी इंडिया यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पॅरा टार्गेट शुटिंग असोसिएशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने राष्ट्रीय पॅरा नेमबाजी स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन दि. ०७ नोव्हेंबर ते ११ नोव्हेंबर २०२४ या काळात श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलातील नेमबाजी स्टेडियम येथे करणेत येणार आहे. सदर स्पर्धा हद्दीबाहेर आहे व ३ लाखापेक्षा जास्त अनुदान असल्यामुळे शासनाची मान्यता घेऊन पॅरा टार्गेट शुटिंग असोसिएशन पुणे यांच्याशी म.न.पा क्रीडा धोरणातील अटी व शर्तीनुसार करारनामा करून, पॅरा टार्गेट शुटिंग असोसिएशन पुणे यांच्या नावे आर्थिक सहाय्य र.रू १५,००,०००/- (अक्षरी र.रू पंधरा लाख फक्त) अदा करणेस व सदरचा खर्च महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर केलेल्या तरतूद मधून खर्ची टाकणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८२** **विषय क्रमांक - ७८२**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८२ दिनांक - १४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र पापु/कावि/२०५/२०२४ दि. १४ /१० /२०२४ अन्वये, मनपाचे चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे"(पॅकेज-२) चे कामास सुधारित प्रशासकीय मान्यता देणेबाबत. |
| ठराव क्र. ७८२ दिनांक - १४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र पापु/कावि/२०५/२०२४ दि. १४/१०/२०२४ अन्वये, मनपाचे चिखली व मोशी येथे पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणे"(पॅकेज-२) चे काम मे.अरिहंत कन्स्ट्रक्शनहे ठेकेदार करीत असून त्यांना निविदा क्र.१३/२-१/२०२०-२१नुसार दि.१४/०६/२०२१अन्वये कामाचे आदेश देणेत आलेले आहेत. सदर कामामध्ये पाण्याची मुख्य नलिका टाकणे व ३ उंच पाण्याच्या टाक्या उभारणे व कार्यान्वित करणेचा समावेश आहे. तसेच ५०० मिमी, ६०० मिमी, ७०० मि मी, ८०० मि मी. व १२५० मि मी.व्यासाच्या एकूण १२००० मी. लांबीच्या जलवाहिनी टाकणेच्या कामाचा समावेश आहे .सदर कामाची निविदा रक्कम रु. ५९.४३ कोटी इतकी असून आत्तापर्यंत या निविदेंतर्गत रक्कम रु. ५३.३६ कोटींची देयके अदा करण्यात आलेली आहेत. प्रकल्प पूर्ण |

करणेसाठी एकूण रक्कम रु. २.२५ कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. सध्याच्या कामाची प्रगती खालीलप्रमाणे आहे-

१)१२५० मिमी व्यासाची MS पाईपलाईन- एकूण ६३७८ मीटर्स पैकी६२०० मीटर्सचे काम पूर्ण.

सदरची पाईप लाईन देहू- आळंदी रस्त्याच्या दुभाजकालगत टाकावी लागत आहे त्यामुळे रस्ते खोदाई, ट्रॉफिक परवानगी, diversions,जलनि:सारण व पावसाळी वाहिन्या, गॅस लाईन्स, विद्युत वाहिन्या ई. गोष्टींची काळजी घेऊन प्रस्तावित जलवाहिनी टाकताना अनेक अडथळे आले. सदराचा रस्ता हा खूपच रहदारीचा असल्यामुळे रस्ता सतत चालू ठेवावा लागतो. तसेच १२५०मिमी पाईप लाईनला आतून लाईनींग करण्याकरिता र.रू.१.३०कोटी वाढीव खर्च झाला.

२) वाढिव inlet/ outlet पाईपलाईन

सदर कामांतर्गत पाण्याच्या टाकीची जागा स्थलांतरित करून पर्यायी जागेत उभारण्यात आली. त्यामुळे inlet/outlet पाईपलाईन टाकण्यासाठी वाढिव ५००,६०० मिमी व्यासाची १.२ किमी लांबीची पाईपलाईन टाकण्यात आली त्यामुळे वाढीव खर्च झाला.

३)चिखली जलशुद्धीकरण केंद्रापासून देहू आळंदी रस्त्यापर्यंत १२५० मिमी व्यासाची MS पाईपलाईन टाकणे-

सदर निविदेअंतर्गत चिखली जलशुद्धीकरण केंद्रापासून देहू आळंदी रस्त्यापर्यंत २२०० मीटर्स पाईपलाईन टाकणेत आली. सदराचा रस्ता खूपच अरुंद व अडीअडचणीचा होता व सोबतच विविध विभागाच्या बऱ्याच सेवावाहीन्या असल्यामुळे पाईपलाईन जास्त खोलीवर टाकणेत आली. त्यामुळे खोदाईचे परिमाणात वाढ झाली आहे. शिवाय, चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाईपलाईन टाकणेसाठी दोन्ही बाजूस अशुद्ध पाण्याची पाईपलाईन तसेच १४०० मिमी व्यासाची जलवाहिनी तसेच पावसाळी वाहिन्या, गॅस लाईन्स, विद्युत वाहिन्या ई. अडथळे असल्यामुळे जलशुद्धीकरण केंद्राच्या मागच्या बाजूने पाईपलाईन टाकणेत आली.त्या मुळे जलवाहिनी ची टाकावयाची लांबी मध्ये वाढ होऊन अतिरिक्त खर्चात वाढ झाली.

४)देहू आळंदी मुख्य रस्त्यावरील चौक व culvert क्रॉसिंग करणे –

देहू आळंदी मुख्य रस्त्यावर १२५० मिमी व ८०० मिमी व्यासाची पाइप लाईन टाकताना कुदळवाडी, रीवरचौक, भारतमाता चौक , Y जंक्शन ई. एकूण अनेक ठिकाणी चौक व culvert क्रॉसिंग करण्यात आले. त्यामुळे पाईप लाईन टाकताना जास्त खोदाई करावी लागली तसेच अनेक ठिकाणी गरजेनुसार concrete encasing करण्यात आले त्यामुळे सदर खर्चात वाढ झाली.सदर प्रकल्पांतर्गत एकूण १०००० मी. लांबीच्या जलवाहिन्यांचे काम देहू-आळंदी रस्ता येथे प्रस्तावित होते. परंतु सदर काम करत असताना जलनि:सारण, स्टॉर्म, गॅस, विद्युत वाहिन्या ठराविक अंतरावर क्रॉसिंग असल्याने प्रस्तावित जलवाहिनी टाकताना अनेक अडथळे आले. त्यामुळे सदर जलवाहिन्यांचे खोदकाम निविदेतील अटी-शर्तीपेक्षा अधिक करावे लागले. तसेच, देहू-आळंदी पालखी सोहळा, मा.पंतप्रधान यांचा देहू येथील नियोजित दौरा यामुळे सदर ठिकाणी टाकणेत आलेल्या पाईपलाईन वरील रस्ता दुरुस्तीचे काम प्रशासकीय सूचनेनुसार पुन:श्च करावे लागले. त्यामुळे सदर प्रकल्प खर्चात मूळ निविदा रक्कमेपेक्षा वाढ हो तआहे.

सदर निविदेतील कामांचा उद्देश हा "चिखली येथील जलशुध्दीकरण केंद्राचे पाणी च-होली, वडमुखवाडी, डुडुळगाव, मोशी, बो-हाडेवाडी इ. भागास पुरेशा दाबाने पुरविणे" असून प्रकल्प पूर्ण झाल्यास सदर भागास पुरेसे पाणी उपलब्ध होईल. त्यानुषंगाने निविदेमधील १२५० मिमी. व्यासाचे १७० मी. राष्ट्रीय महामार्ग क्रॉसिंगचे काम, कुदळवाडी येथील ६० मी. नाला क्रॉसिंगचे काम, पाण्याच्या टाकीचे ५०० मिमी. व ६०० मिमी. व्यासाचे २४० मी. लांबीचे काम व

| | |
|---|---|
| | त्यासंबंधित असणारी हायड्रो टेस्टींग, रस्ता पुर्ववत करणे, कॉंक्रीटीकरण करणे इ. शिल्लक कामे पूर्ण करणे गरजेचे असून सदरील कामे पूर्ण करण्यासाठी र.रु.२.२५ कोटी इतक्या वाढीव निधीची आवश्यकता आहे. तरी, वरील कामाची मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रु.५९.४३ कोटी इतकी असून वाढीवर.रु.२.२५ कोटी सह एकूण र.रु. ६१.६८ कोटी इतकी होत आहे. त्यामुळे सदर काम हे ५.४०% कमी असून निविदा अटी व शर्तीनुसार (Escalation भाव वाढ, GST १८% इत्यादी) र.रु २२.२९ कोटी सह एकूण र.रु ८३.९७ कोटी खर्च होत आहे. सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कमेतील वाढीव खर्चाचे रक्कमेवर व त्यामुळे अंतर्गत बाबींवर दि. २९/०६/२०२२ चे शासन निर्णयानुसार असणारी अप्रत्यक्षित/ असाधारण भाववाढ फरक देय राहणार नाही. तरी त्यासाठी एकूण र.रु ८३.९७ कोटी खर्चास सुधारीत तांत्रिक मान्यता व प्रशासकीय रक्कमेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ७८३** **विषय क्रमांक - ७८३**

**दिनांक - १४/१०/२०२४** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ७८३<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र अक्षेका/स्था/कावि/०८/२०२४ दि. १४ /१० /२०२४ अन्वये, मनपाचे प्रभाग क्र.१० मधील शाहूनगर परिसरातील रस्ते आधुनिक पध्दतीने विकसीत करणे या कामाचा सन २०२४ -२५ चे अंदाजपत्रकात समावेश करुन कामांमध्ये तरतूद वाढ/घट करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ७८३<br>दिनांक -<br>१४/१०/२०२४ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र अक्षेका/स्था/कावि/०८/२०२४ दि. १४ /१० /२०२४ अन्वये, अ' क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्र.१० मधील शाहूनगर मध्ये संभाजीनगर ते कुदळवाडी BRTS रस्त्यास जोडणारे दोन समांतर मुख्य रस्ते असून त्यांची रुंदी १८ मीटर इतकी आहे. सदर रस्त्याचे एकूण क्षेत्रफळ ११८० x १८ = २१२४० चौ.मीटर इतके आहे.<br>सदरचे रस्ते सद्यस्थितीत डांबरी रस्ते असून सुमारे ८ ते १० वर्षापूर्वी या डांबरीकरणाची कामे झालेली आहेत. सद्यस्थितीत रस्त्यांची दुरावस्था असून फुटपाथ व रस्ता नुतनीकरणाची मागणी होत आहे. याबाबत विद्यमान आमदार व माजी मा.नगरसदस्या यांनी रस्ता कॉक्रीटीकरण करणेबाबतची मागणी केली आहे. त्यानुषंगाने सदर ठिकाणचे रस्ते आधुनिक पद्धतीने विकसित करणे गरजेचे आहे. सदर रस्त्याचे ढोबळ अंदाजपत्रक तयार केलेले असून त्याची रक्कम सुमारे १७.९४ कोटी इतकी येत आहे.<br>त्यानुषंगाने प्रभाग क्र.१० मधील शाहूनगर परिसरातील रस्ते आधुनिक पद्धतीने विकसित करणे या कामाचा सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक आहे. मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त) यांचेकडील दि.१०/०६/२०२४ चे परिपत्रकानुसार सुधारीत कामासाठी निविदा / अंदाजपत्रकीय रक्कमेच्या किमान २५ % रक्कम |

ची तरतूद ठेवणे आवश्यक आहे. तथापि सदरची रक्कम सद्यस्थितीत तरतुदी कामे उपलब्ध नसल्याने उर्वरित तरतूद सन २०२४-२५ चे सुधारीत व २०२५-२६ चे मूळ अंदाजपत्रकात करणेत येईल.

सदर कामास सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकात समावेश करून खालील तक्त्यानुसार वाढ-घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| अ. क्र. | उपलेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | अंदाज पत्र कीय रक्कम | लेखा शिर्ष | पान क्र/ अ.क्र | सन २०२४ -२५ ची तरतुद | वाढ | घट | सन २०२४ -२५ चा सुधारीत अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१० मधील शाहू नगर परिसरातील रस्ते आधुनिक पद्ध तीने विकसित करणे. | १८ कोटी | विशेष योजना | नविन काम | ० | १,००,००० | ० | १,००,००० |
| २ | प्रभाग क्र.९ (नविन प्रभाग क्र.१०) संभाजी नगर येथील आरक्षण क्र. जी.पी. १३२ (बस टर्मिनस) विकसित करणे. | १२० कोटी | विशेष योजना | ४१/१ | १०,३०,००० | ० | १,००,००० | ९,३०,००० |
| | | | | | १०,३०,००० | १,००,००० | १,००,००० | १०,३०,००० |

**निर्णय**

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.**

सही/-
(चंद्रकांत पोपट इंदलकर)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**